दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | रविवार, 3 मे 2026 | अंक क्र. 341 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



# शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांवर हरभरा खरेदीस १५ मे पर्यंत मुदतवाढ द्यावी : धनंजय मुंडे



## हजारो क्विंटल हरभरा खरेदी शिल्लक; लेखी पत्राद्वारे पणन मंत्री जयकुमार रावल यांना केली मागणी

■ परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)

केंद्र व राज्य सरकारने शासनामार्फत महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन - नाफेड द्वारा शासकीय दराने सुरू केलेली चना (हरभरा) खरेदी २९ एप्रिल पर्यंत सुरू ठेवण्याचे निर्देश होते मात्र सदर हमीभाव खरेदी पोर्टल २४ एप्रिल रोजीच बंद करण्यात आले असून शासकीय हमीभाव चना खरेदी केंद्रावर खरेदीसाठी १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी लेखी पत्राद्वारे पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांना केली आहे.

नाफेड द्वारा शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांवर प्रति क्विंटल ५,८७५ रुपये प्रमाणे चना खरेदी करण्यात येत होता. यासाठी पणन विभागाने पोर्टलवर नोंद करण्यासाठी २९ एप्रिल पर्यंत मुदत दिली होती. मात्र २४ एप्रिल रोजीच हमीभाव खरेदी करिता नोंदणी करण्याचे पोर्टल बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी नोंदी करूनही हजारो क्विंटल चना (हरभरा) शिल्लक असल्याने संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे शासनाचे याची तात्काळ दखल घेऊन चना खरेदीस १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्याची लेखी पत्राद्वारे मागणी धनंजय मुंडे यांनी केली असून, पणन विभाग सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# आष्टीचे सुपुत्र बजरंग बनसोडे यांना मानाचे 'महासंचालक सन्मानचिन्ह' प्रदान

## मुंबई पोलीस आयुक्तांच्या हस्ते गौरव

■ आष्टी: प्रतिनिधी

अंगात जिद्द आणि मेहनतीची तयारी असेल, तर ग्रामीण भागातील तरुण यशाची कोणतीही शिखरे गाठू करू शकतो, हे आष्टी तालुक्यातील सुपुत्र बजरंग आनंदराव बनसोडे यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. मुंबई पोलीस दलात पोलीस उपायुक्त गुन्हे (प्रतिबंधक) म्हणून कार्यरत असलेल्या बनसोडे यांनामहाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून प्रतिष्ठेचे 'पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह २०२५' प्रदान करण्यातआले. मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या हस्ते हा गौरव सोहळा दिमाखात पार पडला.

बजरंग बनसोडे यांचा जीवनप्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. एका ग्रामीण कुटुंबात जन्मलेल्या बनसोडेयांनी आपल्या करिअरची सुरुवात 'शिक्षक' म्हणून केली होती. मात्र, प्रशासकीय सेवेत जाण्याची ओढआणि खाकी वर्दीचे स्वप्न त्यांना शांत बसू देत नव्हते. शिक्षक म्हणून कार्यरत असतानाच त्यांनी जिद्दीने स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केला आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवत पोलीस दलात अधिकारी म्हणून प्रवेश केला. मुंबईसारख्या महानगरात पोलीस उपायुक्त (गुन्हे प्रतिबंधक) या अत्यंत महत्त्वाच्या पदावर कामकरताना, त्यांनी गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अनेक धाडसी निर्णय घेतले. त्यांना पोलीस सेवाकाळात आजपर्यंत १५६ प्रशस्तीपत्र पोलीस दलाकडून देण्यात आले आहेत. त्यांची हीच कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि उल्लेखनीय कामगिरी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या पोलीसदलाने त्यांना या सर्वोच्च सन्मानाने गौरविले आहे.



बनसोडे यांनी आपल्या कारकिर्दीत केवळ गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवले नाही, तर अत्यंत क्लिष्ट गुन्ह्यांची उकल करण्यातही हातखंडा मिळवला. त्यांच्या तपासाचा दर्जा इतका उच्च आहे की, त्यांनीस्वतः तपास किंवा पर्यवेक्षण केलेल्या तब्बल ८ प्रकरणांमध्ये न्यायालयाने आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

त्यांच्या कार्यकुशलतेमुळेच त्यांची निवड केंद्र सरकारच्या राष्ट्रीय तपास यंत्रणेत (NIA) प्रतिनियुक्तीवर झाली होती. जून २०२२ ते जून २०२५ या काळात त्यांनी 'एनआयए'मध्ये कार्यरत असताना देशाच्यासुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या ३२ दहशतवाद्यांना जेरबंद करून त्यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आयएसआयएस सारख्या दहशतवादी संघटनेच्या विरोधात राबविलेल्या विशेष मोहिमेसाठी त्यांना भारत सरकारकडून केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२४'देऊन गौरविण्यात आले आहे. बजरंग बनसोडे यांच्या या यशामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील तरुण, जे स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहेत, त्यांच्यासाठी बनसोडे यांचे हे यश एक दीपस्तंभ ठरले आहे. "कष्टाला पर्याय नाही आणि जिद्द असेल तर शिक्षक ते पोलीस उपायुक्त असा प्रवास नक्कीच शक्यआहे," असा संदेशच जणू त्यांनी आपल्या कर्तृत्वातून दिला आहे.या सोहळ्याप्रसंगी पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. सर्वच स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आहात तसाच जीवनाचा स्विकार करा आपोआपच जीवन बदलेल : ॲड. श्रीकांत माळकर

## महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन

■ अंबाजोगाई प्रतिनिधी

मुलींच्या सर्वांगिण विकासासाठी व व्यक्तिमत्वाला आकार देण्यासाठी अशी शिबीरे आवश्यक असतात योगेश्वरी शिक्षण संस्थेने गेल्या १७ वर्षापूर्वी आत्मभान शिबीर सुरू केले व ते आजही तितक्या जोमाने यशस्वीपणे सुरू आहे. ही अत्यंत महत्वाची असून या शिबीरातून मुलींना भविष्याबद्दलची दिशा मिळेल. आहात तसाच जीवनाचा स्विकार करा आपोआपच जीवन बदलेल असे मत कोल्हापुर येथील समुपदेशक ऍड.प्रा. श्रीकांत माळकर यांनी व्यक्त केले.

ते योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास,स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, श्रीमती गो.कु.यो. कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते.व्यासपीठावर यो.शि.संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, सल्लागार एन.के. गोळेगांवकर,एम.एस. लोमटे,संचालक सय्यद पाशुमियाँ,डॉ.जे.बी. मोटेगावकर, आर.व्ही.सोनवळकर, प्राचार्य डॉ.प्रशांत देशमुख,शालेय पदाधिकारी आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ऍड. श्रीकांत माळकर म्हणाले की, नकारात्मकता जीवनातून काढून टाकली पाहिजे त्याच बरोबर परिस्थिती बद्दल तक्रार नसावी तरच पुढील प्रवास सुखकारक होईल. वरचेवर काळ बदलत असून समाज माध्यमे हे एक अविभाज्य घटक बनली आहेत. त्याच्यातील जे चांगले आहे ते घेतले पाहिजे येणाऱ्या संकटांना सकारात्मकपणे सामोरे जाण्याची तयारी ठेवावी असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापुरकर म्हणाले की, योगेश्वरी शिक्षण संस्थेने सुरू केलेल्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराच्या माध्यमातून स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करण्याची संधी मुलींना प्राप्त झाली असून यातूनच जीवनात जडणघडण होते.परीक्षेतील गुण म्हणजे गुणवत्ता नव्हे तर जीवनातील स्वतःची उत्तम जडण घडण,चांगली वर्तणुक याची सांगड घालून आपण जगत असलेले व्यक्तिमत्व म्हणजे जीवन व प्रगती असल्याचे त्यांनी सांगितले.प्रारंभी प्रास्तविकातून मुख्याध्यापिका एम. एस.कुलकर्णी यांनी शिबीरा बाबतचा उद्देश सांगितला.पोलीस भरतीत निवड झाल्याबद्दल यो.शि.संस्थेच्या माजी विद्यार्थिनी सोनाली खाडप, पुजा गडदे , दिव्या कदम यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या उपस्थितीत महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक,योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या विविध विभागातील प्राध्यापक,शिक्षक, कर्मचारी,पालक उपस्थित होते.





# ज्येष्ठ पत्रकार धनंजय आढाव आणि मोहन व्हावळे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा !

■ परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)

शब्दांची ताकद आणि आपल्या लेखणीतून सर्वसामान्यांना न्याय देणारे दोन दिग्गज अशी ओळख असणारे दैनिक दिव्य मराठीचे तालुका प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार धनंजयजी आढाव आणि दैनिक संघर्ष नेताचे संपादक मोहनजी व्हावळे यांचा वाढदिवस परळी येथील पत्रकार आणि संपादकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. माध्यम क्षेत्रात काम करताना मार्गदर्शन आणि स्नेहाची थाप नेहमीच मोलाची असते. याच भावनेतून परळीतील माध्यम क्षेत्रातील सर्व मांदियाळीने एकत्र येत या दोन्ही ज्येष्ठ पत्रकारांचे अभिष्टचिंतन केले. यावेळी ज्येष्ठ संपादक बालासाहेब कडबाने, संपादक रामप्रसाद गरड, संपादक राजेश साबणे, ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबूने, रामप्रसाद (बबडु) शर्मा, संजय खाकरे, प्रा. प्रवीण फुटके, प्रा. रवींद्र जोशी, धीरज जंगले, ॲड. देशमुख साहेब, भगवान साकसमुद्रे, नितीन ढाकणे आदींनी उपस्थित राहून धनंजय आढाव आणि मोहन व्हावळे या दोघांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. दोन्ही मान्यवरांचे परळीच्या पत्रकारितेतील योगदान अमूल्य असून, आपले कार्य प्रगती उंचावत राहो, अशा भावना यावेळी सर्व पत्रकारांनी व्यक्त केल्या.



## संपादकिय

# ‘डीईआय’च्या नावाखाली ‘वोकिझ्म’चे षड्यंत्र

नाशिकच्या ‘टीसीएस’ कंपनीतील ‘कॉर्पोरेट जिहाद’ प्रकरणात हिंदू आणि हिंदू महिलांविरुद्धच्या धक्कादायक निष्कर्षांनी एका मोठ्या वादाला तोंड फोडले. त्यानंतर विविध कंपन्यांमधील अनेक कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कामाच्या ठिकाणी अशाच प्रकारच्या समस्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. डाव्या विचारसरणीच्या इस्लामी कट्टरतावाद्यांकडून हिंदूंना लक्ष्य का केले जात आहे, याचे विलेषण सुरू आहे. यामागील सर्वात महत्त्वाच्या कारणांपैकी एक म्हणजे ‘डीईआय’ (Diversity, Equity, and Inclusion) अर्थात विविधता, समानता, समावेश हे धोरण. अनेक कंपन्यांमधील सध्याची परिस्थिती पाहता, आपण ‘डीईआय’ची व्याख्या इस्लाम (I) लादण्यासाठी (Enforce) विभाजन आणि दिशाभूल (Division आणि Diversion) अशी करू शकतो का? ‘डीईआय’च्या नावाखाली, डाव्या विचारसरणीच्या लोकांनी किंवा ‘वोक’ लोकांनी अनेक कंपन्यांमध्ये योग्य पदांवर स्वतःला स्थापित केले आहे. ते आपल्या पदाचा उपयोग कंपनी किंवा संस्था उभारण्यासाठी नव्हे, तर भारतात स्थापन झालेल्या कंपन्यांमधील भारतीय संस्कृती नष्ट करण्यासाठी करत आहेत.

डाव्या विचारसरणीच्या लोकांसाठी कंपनी आणि व्यवस्थापन हे त्यांच्या हिंदुत्वविरोधी आणि भारतविरोधी अजेंडा पुढे नेण्याचे एक शस्त्र बनले आहे, ज्यामुळे अविश्वास, जबरदस्ती, धर्मांतर, छळ आणि लैंगिक अत्याचाराद्वारे दीर्घकाळात कॉर्पोरेट जग आणि भारताला कमकुवत केले जात आहे. उच्च तणाव, नैतिक मानकांच्या विरोधात काम करणे आणि जन्मापासूनच त्यांच्यात रुजवलेल्या भारतीय संस्कृतीच्या विरोधात काम केल्यामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, परिणामकारकता आणि कामाचा दर्जा खालावतो. ‘टीसीएस’ प्रकरण सर्व कंपन्यांसाठी एक इशारा आहे; त्यांनी आपल्या सद्यस्थितीचे मूल्यांकन करून योग्य कायदेशीर कारवाई करण्याची वेळ आली आहे. पुढील पाऊल म्हणजे कंपनीमध्ये ‘डीईआय’ धोरणाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करणे. ‘सर्वे भवन्तु सुखिनः’ आणि ‘वसुधैव कुटुम्बकम्’ यांसारख्या भारतीय आदर्शांनुसार, ‘डीईआय’ धोरणात संपूर्ण सुधारणा करणे आवश्यक आहे. अनेक कंपन्यांमधील सध्याची ‘डीईआय’ प्रणाली या मानवी आदर्शांचे उल्लंघन करते. सध्याची तत्त्वे म्हणजे विविधता, म्हणजे विभाजन आणि दिशाभूल, समानता म्हणजे बळजबरी आणि समावेशकता, म्हणजे इस्लाम. दीर्घकाळात मानवतेकडे पाहण्याचा असा विकृत दृष्टिकोन कॉर्पोरेट विनाशाचे कारण ठरेल. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीच्या बाबतीत तुम्ही जे काही चांगले काम कराल, तुमचे ‘डीईआय’ धोरण तुमची प्रतिष्ठा आणि वाढ यांसह सर्व गोष्टींना सुरुंग लावेल. चला, ‘डीईआय’ धोरणाच्या पुनरावलोकनावर लक्ष केंद्रित करूया.

गेल्या काही दशकांमध्ये विविधता, समानता आणि समावेश (‘डीईआय’) ही संकल्पना एका प्रतीकात्मक महत्त्वाकांक्षेपासून, स्वतःच्या कर्मचाऱ्यांकडून, तसेच नियामक, हितधारक आणि सामान्य जनतेकडून, नियोक्त्याची विश्वासार्हता, संस्कृती आणि अनुपालन परिपक्वतेचे मूल्यांकन करण्यासाठीच्या एका निश्चित मानकापर्यंत विकसित झाली आहे. अनेक संस्थांनी अंतर्गत धोरणे, नेतृत्वाची निवेदने आणि सार्वजनिक खुलासे यांद्वारे औपचारिक ‘डीईआय’ वचनबद्धता दर्शवली असली, तसेच समावेशक भरती, मातृत्व साहाय्य, सुलभता, पायाभूत सुविधा, वाजवी सोयीसुविधा आणि लिंग-विविध नेतृत्वाच्या दिशेने पावले उचलली असली, तरी ‘कार्यबल’ प्रणालींमध्ये ‘डीईआय’चे व्यावहारिक एकत्रीकरण असमान राहिले आहे, ज्यात अनेक कॉर्पोरेशन्स हिंदूंच्या विरोधात पक्षपाताचा एक विशिष्ट अजेंडा राबवत आहेत.

विविधता, समानता, सर्वसमावेशकता आणि संवेदनशीलता (‘डीईआय’) ही एक व्यापक संज्ञा आहे, जी आपले लक्ष एका अधिक निरोगी आणि खुल्या कॉर्पोरेट-संस्कृतीकडे वळवण्यासाठी तयार केली गेली आहे. ही संस्कृती लोकांना त्यांचा वर्ग, जात, बोलीभाषा, लिंग, पंथ, शारीरिक वैशिष्ट्ये इत्यादींचा विचार न करता समान संधी प्रदान करते. तथापि, यामागील चांगला हेतू असूनही, डाव्या विचारसरणीच्या समूहांनी याचा वापर स्वतःच्या स्वाथ फायद्यासाठी आणि हेतूंसाठी केला, जे कॉर्पोरेट तत्त्वे आणि माणुसकीच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. अमेरिकेतील विविधता, समानता आणि समावेश (‘डीईआय’) ‘हिंदू अमेरिकन फाऊंडेशन’च्या मते, अमेरिकेतील जातीवर आधारित विविधता, समानता आणि समावेश (‘डीईआय’) प्रशिक्षण कार्यक्रम हिंदूविरोधी भावनांना खतपाणी घालत आहेत. त्यांनी ‘न्यूयॉर्क टाइम्स’ आणि ‘ब्लूमबर्ग’वर हा अभ्यास दडपल्याचा आरोपही केला आहे.

‘हिंदू अमेरिकन फाऊंडेशन’ने (एचएएफ)अमेरिकेतील दोन प्रमुख माध्यम संस्था, ‘न्यूयॉर्क टाइम्स’ (एनवायटी)आणि ‘ब्लूमबर्ग’वर, अमेरिकेतील जातीवर आधारित विविधता, समानता आणि समावेश (‘डीईआय’) प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे हिंदूंना कसा पूर्वग्रहदूषितपणा सहन करावा लागतो, हे उघड करणारा अहवाल दडपल्याचा आरोप केला आहे. ‘नेटवर्क कॉन्टेजियन रिसर्च इन्स्टिट्यूट’ने (एनसीआरआय) ‘रटगर्स’ विद्यापीठाच्या भागीदारीत हा अभ्यास केला, ज्यामध्ये विशेषतः ‘इक्वालिटी लॅब्स’च्या जातीविरोधी प्रशिक्षणाची तपासणी करण्यात आली आणि असे कार्यक्रम हिंदूविरोधी भेदभाव आणि द्वेष वाढवतात, हे उघड झाले.

‘नेटवर्क कॉन्टेजियन रिसर्च इन्स्टिट्यूट’ (एनसीआरआय) आणि ‘रटगर्स’ विद्यापीठाने केलेल्या या अभ्यासात, ‘इक्वालिटी लॅब्स’ या दलित नागरी हक्क संघटनेच्या साहित्याचा अभ्यास करण्यात आला. असे आढळून आले की, या प्रशिक्षणांना सामोरे गेलेले सहभागी, ब्राह्मणांना ‘परजीवी’ किंवा ‘विषाणू’ म्हणण्यासारख्या अमानवीय शब्दांचा वापर करण्याची अधिक शक्यता होती. ‘एचएएफ’ने असाही दावा केला की, या संशोधनातून हे दिसून आले आहे की, असे विविधता, समानता आणि समावेश (‘डीईआय’) कार्यक्रम भेदभाव कमी करण्याऐवजी वांशिक अविश्वास कसा वाढवू शकतात. प्रमुख माध्यम संस्थांनी यात रस दाखवल्याचे जाहीर केले असले, तरी ‘एचएएफ’चा आरोप आहे की, ‘शिक्षात्मक सूड’ आणि हिंदूंप्रति वाढत्या शत्रुत्वाचे पुरावे या मुख्य प्रवाहातील माध्यमांच्या जवळजवळ लक्षातच आले नाहीत.

# खुनशी जोकराची आत्मघाती भूमिका!




‘नारीशक्ती वंदन विधेयक’ लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताच्या अभावी फेटाळले गेले असले, तरी हा पराभव सरकारचा नसून विरोधी पक्षांचाच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी असोत की, गृहमंत्री अमित शाह, त्यांनी महिलांना त्यांचा न्याय्य हक्क देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. आता विरोधी पक्षांना येत्या सर्व निवडणुकांमध्ये आपल्या भूमिकेचा जाब महिला मतदारांना द्यावा लागणार आहे. त्याचा प्रारंभ प. बंगाल व तामिळनाडूतील विधानसभा निवडणुकांपासून होईल.

देशाच्या लोकसंख्येत जवळपास निम्मा वाटा असलेल्या महिलावर्गाला संसदेत आणि राज्यांच्या विधिमंडळात 33 टक्के राखीव जागा देण्याचे विधेयक लोकसभेत काल नामंजूर झाले. याचे कारण, ‘घटनादुरुस्ती विधेयक’ संमत होण्यासाठी लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता असते. सध्याच्या मोदी सरकारकडे पुरेसे बहुमत असले, तरी लोकसभेत दोन तृतीयांश बहुमत नाही. मात्र, हा पराभव असला, तरी तो सरकारचा नसून खरं तर विरोधी पक्षांचा आहे. हा निकाल पाहिल्यावर या विधेयकाशी संबंधित असलेली आणखी दोन विधेयकेही सरकारने मागे घेतली.

महिलांना 33 टक्के आरक्षण देण्याचे विधेयक तीन वर्षांपूवच लोकसभेने जवळपास एकमताने मंजूर केले होते. मात्र, त्याची अंमलबजावणी येत्या लोकसभा निवडणुकांपासून करण्यासाठी घटनादुरुस्ती आवश्यक होती. त्यासाठीच पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने हे विधेयक विशेष अधिवेशन बोलावले होते. गेले दोन दिवस या विधेयकावर सांगोपांग चर्चा होत होती. हे विधेयक येत्या लोकसभा निवडणुकीपासून लागू करायचे, तर सध्याच्या लोकसभा सदस्यांच्या संख्येत वाढ करण्याची आवश्यकता होती. कारण, 1976 सालापासून लोकसभेची सदस्यसंख्या गोठवून ठेवण्यात आली होती. तिची मुदत यंदा समाप्त होत आहे. मात्र, 2026-27 मधील जनगणनेनंतरच लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना केली पाहिजे, अशी विरोधी पक्षांची मागणी होती. ती अव्यवहार्य होती. कारण, या जनगणनेचे परिणाम मिळाल्यानंतर पुढील लोकसभा निवडणुकीपूव पुरेसा अवधी उपलब्ध नव्हता. म्हणून आताच ही सदस्यसंख्या 850 पर्यंत वाढविण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला होता. ते विधेयकही काल मागे घ्यावे लागले. विरोधी पक्षांची, विशेषतः काँग्रेस व समाजवादी पक्षाची भूमिका ही कायमच महिला आरक्षणविरोधी राहिली आहे. या पक्षांच्या नेत्यांना आपले मतदारसंघ सुरक्षित ठेवायचे असल्याने त्यांना महिलांचे आरक्षण नको. त्यांच्याकडे पुरेशा महिला उमेदवारांचीही वानवाच. गेल्या दोन दिवसांत विरोधी पक्षांच्या अनेक सदस्यांनी या आरक्षणाला वेगवेगळे फाटे फोडून हे विधेयक कसे बारगळेल, यासाठी प्रयत्न केले होते.

अमित शाह यांनी या विधेयकावरील चर्चेची सांगता करताना या विधेयकाची आवश्यकता किती आणि का आहे, ते अगदी सोदाहरण समजावून सांगितले. देशातील इतर मागासवगय (ओबीसी) समाजातील मतदार नेहमीच भाजपच्या मागे ठामपणे उभा राहिलेला दिसतो. संसद सदस्यांची संख्या वाढली असती, तर अधिक ‘ओबीसी’ उमेदवारांना खासदार बनण्याची संधीही निश्चितच मिळाली असती. त्यातही अधिक महिलांना ही संधी मिळाली असती. पण, विरोधकांच्या नकारात्मक भूमिकेमुळे या समाजाचे आणि महिलांचे असे दुहेरी नुकसान झाले आहे. आता काँग्रेस व हे विरोधी पक्ष कोणत्या तोंडाने ‘ओबीसी’ व महिला मतदारांकडे मते मागणार आहेत? केवळ तात्कालिक लाभासाठी या विरोधी पक्षांनी स्वतःचे कायमचे नुकसान करून घेतले आहे, असेच म्हणावे लागेल.

राहुल गांधींनी आपल्या कालच्या लोकसभेतील भाषणात तर महिलांच्या आरक्षणाशिवाय अन्य वायफळ विषयांवर भरपूर बकवास केली आणि सदनाचा अमूल्य वेळही एकप्रकारे वायाच घालविला. पण, त्यांच्या मनातील या सरकारबद्दलचा, विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दलचा विखार त्यांच्या भाषणात स्पष्टपणे दिसून आला. आपल्या बालपणातील रचलेल्या बनावट आठवणींच्या आडून त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा तर अपमान केलाच; पण ‘ऑपरेशन सिंदूर’, ‘सर्जिकल स्ट्राईक’ वगैरे महत्त्वपूर्ण सैन्य अभियानांत आपल्या प्राणांची बाजी लावून देशाचे रक्षण करणाऱ्या सैन्यदलांचाही त्यांनी अपमान केला. अर्थात, त्यांची देशविरोधी मानसिकता लक्षात घेतली, तर त्याचे नवल वाटत नाही.

काँग्रेसचे, म्हणजे राहुल गांधी यांचे- आत्मघाती राजकारण त्या पक्षाचेच नव्हे; तर अन्य विरोधी पक्षांचेही मोठे नुकसान करीत आहे. तरीही, अन्य विरोधी पक्ष काँग्रेसच्या दिवाळखोर राजकारणामागे का फरफटत जातात, हे अनाकलनीयच. लोकसभा अध्यक्षांविरोधातील काँग्रेसच्या अविश्वास प्रस्तावाला पाठिंबा देण्यास तृणमूल काँग्रेसने सुरुवातीला नकार दिला होता. पण, दुर्दैवाने शेवटच्या क्षणी तो पक्षही काँग्रेससोबत गेला आणि त्याचे हसे झाले. आताही तृणमूल काँग्रेस पक्षाकडे महिला खासदार व आमदारांची संख्या बरीच असून, बंगाली महिला मतदारही या पक्षाला मोठा पाठिंबा देत असतात. त्या पक्षाच्या नेत्या ममता बॅनज याही महिला आहेत. त्या राज्यात काँग्रेस पक्ष हा तृणमूलचा विरोधी पक्ष. असे असतानाही या पक्षाने या विधेयकाला संसदेत विरोध करणे हे दुर्दैवीच. त्या राज्याच्या विधानसभा निवडणुका काही दिवसांवर येऊन ठेपल्या असून, त्यात या अनावश्यक विरोधाचे प्रतिबिंब उमटल्याशिवाय राहणार नाही.

जोकर म्हटला म्हणजे सर्वांना हसविणारी, विनोदी स्वभावाची एक व्यक्ती अशीच प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. ‘बॅटमॅन’ या चित्रपटातील जोकराची व्यक्तिरेखा मात्र खलनायकी आहे. त्या व्यक्तीचे दृश्यस्वरूप पारंपरिक जोकरप्रमाणे असले, तरी तो एक खुनशी खलनायक असतो. लोकसभेतील विरोधी पक्षनेता राहुल गांधी यांची यापूवची भाषणे आणि कालचे ‘नारीशक्ती वंदन विधेयका’वरीलही भाषण पाहिल्यावर कोणाला या चित्रपटातील ‘जोकर’ची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांनी लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचना विधेयकाच्या निमित्ताने उत्तर विरुद्ध दक्षिण भारतातील राज्ये अशी फूट पाडण्याचाही जोरदार प्रयत्न केला. पण, सत्ताधारी पक्षाने, त्यातही अमित शाह यांनी आकडेवारीसह त्यातील फोलपणा उघड केला. आता हा ‘जोकर’ विरोधी पक्षांना आगामी काळात रडविण्याची भूमिका पार पाडेल, यात शंका नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी असोत की, गृहमंत्री अमित शाह, यांनी आपल्यापरीने महिलांना त्यांचा न्याय्य हक्क देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला. पण, त्यांच्या प्रामाणिक भावना कुटिल राजकारणाच्या हितसंबंधांखाली दुर्दैवाने चिरडल्या गेल्या. यानिमित्ताने विरोधी पक्षाला आपलाच विजय झाल्याचा, मोदी सरकारला धडा शिकवल्याचा अल्पकालीन आनंद मिळाला असला, तरी त्याची दीर्घकालीन किंमत ही मोजावी लागणार आहेच. पण, भविष्यात महिलांना लोकसभेत 33 टक्के आरक्षण मिळेल, या आशेवर हे सरकार आपले प्रयत्न जारी ठेवेल, यात शंका नाही. तोपर्यंत विरोधी पक्षांना देशभरातील महिला मतदारांना जाब द्यावा लागेल. त्याची पहिली चिन्हे तामिळनाडू व प. बंगाल विधानसभेच्या निवडणुकीत उमटलेली दिसतील, हे निश्चित!

# अब तक छप्पन! कब तक छप्पन?

चिनी संसदेत एकूण दोन हजार, 977 खासदार आहेत. चीन हा भारताच्या साधारण दुपटीने मोठा देश आहे. चिनी समाजात एकंदर 56 वंशांचे लोक आहेत. यातला ‘हान’ हा वंश संख्येने सर्वात मोठा आहे. साहजिकच, चीनचे राजकारण, समाजकारण, अर्थकारण, भाषा, संस्कृती अशा जीवनाच्या सर्वच प्रमुख क्षेत्रांवर हानवंशीय लोकांचा वरचष्मा आहे. डॉ. सन यत सेन, ज्याने चीनला मध्ययुगातल्या राजेशाहीतून आधुनिक लोकशाहीयुगात आणले, तो वंशाने हान होता. ‘जनरॅलिसिमो (म्हणजे युरोपीय भाषेत सेनापती-जनरल) चँग कै शेक ज्याच्या राजवटीविरुद्ध बंड पुकारून, साम्यवादी माओ-त्से-तुंग (माओ झेडाँग) याने 1949 साली सत्ता हडपली, तोही वंशाने हान होता, आणि स्वतः माओसुद्धा वंशाने हानच होता. आजही सत्ताधारी ‘नॅशनल कम्युनिस्ट पाट’चे बहुसंख्य नेते, मंत्री, खुद्द राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग हे सगळे हानवंशीयच आहेत. हे सगळे सत्ताधारी हानवंशीय खासदार संसद अधिवेशनात कायम काळ्या किंवा करड्या रंगाच्या पोशाखात, ज्याला ‘बिझनेस सूट’ असे म्हटले जाते, तशा पोशाखात वावरतात. अन्य पंचावन्न वंशांच्या प्रतिनिधींनी मात्र त्यांच्या पारंपरिक वेशांमध्ये वावरावे, अशी अपेक्षा असते.

त्यामुळे चिनी संसद अधिवेशनात बिगर हानवंशीय खासदार लगेच वेगळे ओळखू येतात. यंदाच्या अधिवेशनातही या खासदारांनी आपले पारंपरिक पोशाख आणि चित्रविचित्र शिरस्त्राणे परिधान करून, मोठीच गंमत आणली होती. पूव महिलांनाच नाना तऱ्हेचे रंगीत पोशाख करायला आवडत असे. पण, आता पुरुषांनाही वेगवेगळे रेशमी, झुळझुळीत, लक्षवेधक पोशाख परिधान करणे आवडते. गडद लाल, चमकदार गुलाबी, गडद निळा हे रंग आणि त्यांवर नाना तऱ्हेचे भरतकाम, प्राण्यांच्या चितारलेल्या आकृती यांनी चिनी संसदेच्या ‘द ग्रेट हॉल ऑफ पीपल’ या प्रख्यात सभागृहात मोठीच गंमत उसळून दिली होती. एका महिला खासदाराने एक भलामोठा पारंपरिक मुकुट घातला होता. त्यात अनेक छोट्या घंटा बसवलेल्या होत्या. तिने जरा डोके हलवले की, त्या घटांचा मधुर ध्वनी सर्वत्र पसरत होता.

1949 साली माओच्या साम्यवादी पक्षाने सत्ता हडपली आणि 1950 पासून त्याने, चीनच्या अवाढव्य प्रदेशात सर्वत्र रेटून अंमल बसवायला सुरुवात केली. चीनमध्ये हानवंशीयांनंतर ‘माँचू’ आणि ‘मंगोलियन’ वंशांचे लोक संख्येने जास्त आहेत. माओने सगळ्यांवरच दडपशाहीचा वरवंटा फिरवला. एकदा आपला अंमल पक्का बसल्यावर त्याने, वांशिक अल्पसंख्याकांना बऱ्यापैकी सुविधा दिल्या. म्हणजे कुठेही प्रवास करण्याची मुभा दिली. त्यांच्या मुलांना ‘मांदारिन’ या सरकारच्या अधिकृत भाषेबरोबरच त्यांची पारंपरिक भाषा, संस्कृती शिकवण्याची मुभा दिली. पण, एवढेच स्वातंत्र्य! आपण चीनपेक्षा वेगळे आहोत; चीनने आम्हाला जबरदस्तीने त्यांच्या देशात सामील करून घेतले आहे आणि साम्यवादी तत्त्वज्ञान आम्हाला मान्य नाही, इत्यादी गोष्टी मुलांना शिकवाल, तर खबरदार! तरीही, झिनजियांग प्रांतातले उघूर मुसलमान, तिबेटमध्ये बौद्ध लामा आणि इतर मंगोलिया प्रांतातले मंगोल यांनी गडबड केल्यावर, त्यांना साफ चेपून टाकण्यात आले. त्या प्रांतांमध्ये हानवंशीय चिन्यांच्या नवनवीन वसाहती मुद्दाम उभारण्यात आल्या. त्या प्रांतांमधल्या वांशिक अल्पसंख्याक मुलींची लग्ने हानवंशीय पुरुषांशी लावून, लोकसंख्येचे समीकरण बदलण्याचा पद्धतशीर प्रयत्न करण्यात आला, आजही चालूच आहे. साम्यवाद हा इस्लामप्रमाणेच एक विस्तारवादी धर्म आहे, असे म्हटले गेले आहे. ते कसे खरे आहे पहा. जगभर ज्या युक्तीने मुसलमान आपली लोकसंख्या वाढवत नेत असतात, तीच युक्ती चिनी साम्यवादी वापरत आहेत.

तर, 1950 ते 2000 अशी चांगली 50 वर्षे माओ, डेंग झियाओ पिंग, जियांग झेमिन, हू जियांतो वगैरे चिनी नेत्यांनी वांशिक अल्पसंख्याकांना तसे बरे वागवले. ‘आमच्या देशातले छप्पन वंश म्हणजे छप्पन रंगीबेरंगी फुलेच आहेत’ वगैरे काव्यात्म वर्णने करण्यात आली. पण, 2013 साली शी जिनपिंग राष्ट्राध्यक्ष बनले आणि परिस्थिती झपाट्याने बदलली. भाषा, संस्कृती आणि मिश्रवंशीय विवाह याबाबत आता कोणतीही सवलत दिली जाणार नाही. म्हणजे उघूर, तिबेटी आणि मंगोल या वांशिक अल्पसंख्याकांना, ज्याप्रमाणे मिश्र विवाहांच्या माध्यमातून अधिक अल्पसंख्याक करण्यात आले किंवा त्यांची वेगळी वांशिक ‘ओळख’ पुसून टाकून त्यांना हानवंशीय लोकांमध्ये मिसळून टाकण्यात आले, तेच धोरण आता इतर सर्व वांशिक अल्पसंख्याकांनाही लागू होणार आहे किंवा झालेच आहे. मार्च 2026च्या वार्षिक संसद अधिवेशनात चीनने पारित केलेल्या या विषयीच्या नव्या कायद्याचे नाव आहे- ‘वांशिक एकता आणि प्रगती यांचा पुरस्कर्ता कायदा’. चीनच्या सत्ताधाऱ्यांना वांशिक अल्पसंख्याकांचे नृत्य चालणार आहे, संगीत चालणार आहे, रंगीबेरंगी वस्त्रभूषणे चालणार आहेत. मात्र, याव्यतिरिक्त आपली वेगळी वांशिक ‘ओळख’ म्हणजे चिनी हानवंशीयांपेक्षा वेगळी ओळख दाखवलेली चालणार नाही, अजिबात चालणार नाही.

मार्च 2026 मधले हे वार्षिक अधिवेशन ‘कव्हर’ करण्यासाठी गेलेल्या एका पाश्चिमात्य वार्ताहराने, इतर मंगोलिया प्रांतातल्या एका मंगोलवंशीय महिला खासदार बाईला गाठले. तिच्या झुळझुळीत, रेशमी, सुंदर भरतकाम केलेल्या पारंपरिक पोशाखाची खूप तारीफ वगैरे करून हा वार्ताहर तिला म्हणाला, “नव्या कायद्याच्या बाजूने तुम्ही मतदान केलेत खरे पण, या कायद्याने तुम्हा इतर मंगोलियन वांशिक अल्पसंख्याकांना ठोस असा काय फायदा झाला?” ती खासदार महिला नुसतीच रंगीबेरंगी कपडे ल्यालेली शोभेची बाहुली नसावी. तिने या वार्ताहराच्या प्रश्नातली मेख ओळखून त्याला म्हटले तर हवी ती बातमी दिली, म्हटले तर दिली नाही. म्हणजे काय? ती म्हणाली, “फक्त मंगोल या वांशिक गटासाठी उपयुक्त असे या नव्या धोरणात काही नाही. पण, चीन हे एक एकात्म राष्ट्र आहे, ही भावना निर्माण होण्यासाठी हे धोरण नक्कीच मार्गदर्शक आणि म्हणूनच योग्य आहे.”

आता, चीन सरकार हे अत्यंत निर्घृण, निर्दय असे साम्यवादी शासन आहे आणि त्यांना त्यांच्या देशातले सगळे वांशिक अल्पसंख्याक गट संपवायचे आहेत, म्हणून आपण त्यांच्या या उद्योगाकडे प्रतिकूल नजरेने पहातो. पण, स्वतःला सुधारलेले, लोकशाहीवादी वगैरे म्हणवून घेणाऱ्या पाश्चिमात्यांना म्हणजे युरोपीय देश किंवा अमेरिका यांना, चीनला नावे ठेवण्याचा काहीही अधिकार नाही. कारण, त्यांनी शतकानुशतके तेच उद्योग केलेले आहेत. पोर्तुगीजांनी भारतात गोवा, केरळ या ठिकाणी भीषण अत्याचार करून, बेछूट बाटवाबाटवी करून, हिंदूंना संपवण्याचा प्रयत्न केला. आजही सेवा, शिक्षण, रुग्णसेवा अशा छुप्या नावाखाली त्यांचे तेच उद्योग चालू आहेत. अमेरिका खंडात तर त्यांनी स्थानिक वंशांच्या सरळ कत्तलीच केल्या. खुद्द युरोप खंडातील ख्रिश्चन पाद्र्यांनी, स्थानिक लोकांचे मूळ उपासना संप्रदाय ‘पेगन’, ‘हीदन’ म्हणजे रानटी ठरवून कायमचे संपवले. सगळे एकदाचे ख्रिश्चनधमय झाले तरी त्यांना चैन पडेना. मग त्यांनी अँग्लो-सॅक्सन वंश विरुद्ध नॉर्मन वंश; गॉल वंश विरुद्ध जर्मैनिक वंश; स्लाव्ह वंश विरुद्ध रोमन वंश अशा लढाया करून, भरपूर कत्तली केल्या. हिटलरने म्हणे चर्चिलला अशी ऑफर दिली होती की, “मला म्हणजे आम्हा जर्मन आर्यनवंशीयांना यहुदी (म्हणजे ज्यू), पूर्व युरोपातले स्लाव्हवंशीय आणि फ्रान्समधले गॉलवंशीय यांचा कायमचा बंदोबस्त करायचा आहे. तुम्ही इंग्रज म्हणजे अँग्लो-सॅक्सनवंशीय लोक तसे आम्हा आर्यनवंशीयांना जवळचे आहात. म्हणून ब्रिटनला तुम्ही युद्धातून अलिप्त ठेवा.” म्हणून म्हणे, हिटलरने अगदी पक्की तावडीत सापडलेली सुमारे साडेतीन लाख ब्रिटिश सेना, डंकर्क या ठिकाणाहून सुखरूप माघारी जाऊ दिली. मग चर्चिलने ही ऑफर का नाकारली? तो फ्रान्स आणि रशिया यांच्या लोकशाही राजवटींचा पाठीराखा होता किंवा एकंदरीत लोकशाही मूल्यांचा समर्थक होता म्हणून? छेः छे! तसे काहीच नव्हते. एकतर चर्चिलला हे पक्के माहीत होते की, काही काळ कदाचित हिटलर आपल्याशी मित्रत्वाने वागेल पण, नंतर तो आपला नंबर लावणारच. म्हणजे आज फ्रान्स आणि रशिया जात्यात असले, तरी आपण सुपात आहोतच आणि दुसरे म्हणजे, हिटलरच्या कथित आर्यन वंशापेक्षा, आम्हा ब्रिटिशांचा अँग्लो-सॅक्सन वंशच जास्त श्रेष्ठ आहे. किंबहुना, आमचाच वंश जगात सर्वश्रेष्ठ आहे, हा अहंकार चर्चिलपाशीही होताच.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# संगम येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

**परळी (प्रतिनिधी)**

येथील लॉर्ड बुद्ध मित्र मंडळ व समस्त ग्रामस्थांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या सोहळ्यात विचारांचा जागर, सामाजिक घोषणा आणि विविध स्पर्धांच्या माध्यमातून महापुरुषाला अभिवादन करण्यात आले.





**कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजेश इंगोले यांनी जयंती दिनी मार्गदर्शन करत केली वर्षभर मोफत उपचारांची घोषणा 'मिताली प्रतिष्ठान'च्या स्पर्धा आणि बक्षीसांचेही वितरण**

### ■ 'मिताली प्रतिष्ठान'चा पुढाकार आणि स्पर्धा

मिताली प्रतिष्ठान, संगम यांच्या वतीने महिलांसाठी 'भीमाची वाघीण' ही गीत गायन व उखाणा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये वर्षा विलास गायकवाड (प्रथम), उषा प्रवीण रोडे (द्वितीय) आणि अलका विकास रोडे (तृतीय) यांनी पारितोषिके पटकावली. तसेच भाषण स्पर्धेत तनिष्का गायकवाड, तनिशा गायकवाड, रिषभ चिंगले आणि कुमारी पंचांगे यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राजेश इंगोले यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि आजच्या काळातील महत्त्व या विषयी सखोल मार्गदर्शन करत "मिशन व्यसनमुक्ती" अंतर्गत आपल्या दवाखान्यात वर्षभर गरजू लोकांसाठी मोफत उपचार केले जातील, अशी घोषणा त्यांनी केली. त्यांच्या या दातृत्वाचे गावकऱ्यांनी स्वागत केले.

श्रीमती रमाबाई दासूद मॅडम यांनी बौद्ध धम्माचे आचरण कसे करावे आणि एक आदर्श नागरिक म्हणून कसे राहावे, यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तर लक्ष्मण वैराळ सर यांनी "विकासासाठी शिक्षणाची मोट बांधा आणि महापुरुषांचा आदर करा" असा संदेश दिला. श्रीमती गीता यादव मॅडम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले यांच्या क्रांतीकारी विचारांचे विश्लेषण केले. तसेच ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी आपल्या शैलीत बाबासाहेबांच्या विचारांची उजळणी केली. तर नितीन ढाकणे व दिलीप भालेराव सर यांनी उपस्थितांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

### ■ ग्रंथ वाटप आणि नियोजन -

ज्ञानाचा प्रसार व्हावा यासाठी मिलिंद रोडे सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित विविध ग्रंथांचे वाटप केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन दीपक गायकवाड सर यांनी केले. उत्सव कमिटीचे अध्यक्ष रितेश रोडे, उपाध्यक्ष भीमा गायकवाड आणि सचिव विनोद रोडे यांनी नियोजनाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली.

या सोहळ्याला भारत गायकवाड, विलास गायकवाड, वसंत गायकवाड, विकास रोडे, सतीश रोडे, देविदास रोडे, पांडुरंग रोडे, प्रवीण रोडे, सचिन रोडे, साहेबराव भुतांगळे, दादासाहेब तांगडे, वृक्षराज दहिवडे, धर्मराज दहिवडे, बबन दहिवडे, सुशील पंचांगे, दीपक पंचांगे, गोविंद गायकवाड, आकाश सरवदे, बाबासाहेब रोडे, समाधान रोडे, प्रल्हाद गायकवाड, सायस साबळे, मनोज नागरगोजे, राजेंद्र मस्के (पत्रकार), विजय वाघमारे (पोलीस पाटील) आणि हरीश नागरगोजे यांच्यासह लॉर्ड बुद्ध मित्र मंडळाचे सर्व सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाची बोर्ड परिक्षेत यशाची परंपरा कायम, विज्ञान शाखेचा 100 टक्के, तर कला शाखेचा 76.8 टक्के

## विज्ञान शाखेतून स्नेहल लक्ष्मण अनंतपुरे तर कला शाखेतून शेख मसिरा मोईझ प्रथम













**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

लक्ष्मीबाई देशमुख महिला कनिष्ठ महाविद्यालयाने १२ वी बोर्ड परिक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली असून महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतून स्नेहल अनंतपुरे तर कला शाखेतून शेख मसिरा मोईझ प्रथम आली आहे. याबदल प्राचार्या व संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

शहरातील लक्ष्मीबाई देशमुख कनिष्ठ महिला महाविद्यालयाने बारावी बोर्ड परिक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली असून कॉलेजचा निकाल ९२.८१ टक्के लागला आहे. महाविद्यालयातून विज्ञान शाखेची विद्यार्थिनी विज्ञान शाखेतून प्रथम स्नेहल लक्ष्मण अनंतपुरे (७९.६७), द्वितीय- शेख अनम सिराज (७४.५०), तृतीय- सय्यद झवेरिया अफसर (७३.८३) तर कला शाखेची विद्यार्थिनी शेख मसिरा मोईझ (७८.८३) प्रथम, द्वितीय शेख इशरत बेगम सलीम

(७२.५०), तृतीय बालिका सोनेराव तांदळे (७२.१७) क्रमांक पटकावला आहे. कला शाखेतून एक विद्यार्थी विशेष प्राविण्य तर १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून एक विद्यार्थी विशेष प्राविण्य तर ५८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत

या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक अनिलराव देशमुख, अध्यक्ष संजय देशमुख, सचिव रविंद्र देशमुख, कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, कनिष्ठ विभागाचे प्रा. प्रविण फुटके, प्रा प्रविण नव्हाडे, प्रा अशोक पवार, प्रा विशाल पौळ, प्रा आशिलता शिंदे, प्रा डॉ विना भांगे, प्रा आचार्य सह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

---

# राजर्षी शाहू विद्यालयाचे नगराध्यक्षा सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**





येथील जलालपूर रोडवरील शिक्षक कॉलनी भागात नूतन 'राजर्षी शाहू विद्यालयाचे नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा शुक्रवार, १ मे रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला शहरातील मान्यवर आणि नागरिकांनी मोठी उपस्थिती दर्शवली होती.

कार्यक्रमास श्रीदत्त मंदिर, टोकवाडी येथील ह.भ.प. मोरे महाराज यांची आशीर्वाचनपर प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्याला गटशिक्षणाधिकारी सौ. अन्सारी मॅडम उपस्थित होत्या. मान्यवराच्या हस्ते दीपप्रज्वलन करून व फित कापून उद्घाटन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते विद्यालयाच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार कार्यक्रमाचे आयोजक डॉ. एस.एस. कांबळे नाथेकर आणि माउली मुंडे (कन्हेरवाडीकर) यांनी केले होते. गणराय कॉम्प्लेक्समधील या विद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमाचे पालकांनी स्वागत केले आहे. कार्यक्रमास पालक, शिक्षक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# कलगाव येथे सेवापुर्ती सोहळा उत्साहात संपन्न

**महागाव | प्रतिनिधी**



आज दिनांक 30 एप्रिल 2026 रोजी आमच्या जि.प.उच्च प्राथमिक शाळा, कलगाव येथील मुख्याध्यापक साहेबराव भांगे यांच्या सेवापुर्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष गजानन सोनटक्के अध्यक्ष शा.व्य. समिती हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी, गटशिक्षणाधिकारी संजयजी कांबळे, पोलीस पाटील नारायण उकंडे, विस्तार अधिकारी कु.किरण वाढवे, केंद्र प्रमुख बाबु खंदारे, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे अध्यक्ष गजानन नांदेडकर सत्कार मुर्ती साहेबराव भांगे व सौ.भांगे ,कु अंजली भांगे, सौ.जोशिला पवार, उपाध्यक्ष परमेश्वर भंडारे, अनिल भोपळे, विविध शिक्षक संघटनेचे पदाधिकारी गजानन गावंडे, शंकर जायमेत्रे, विनोद कांबळे, प्रकाश कांबळे, माने सर, विविध संघटनेचे पदाधिकारी विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते या प्रसंगी प्रास्ताविक शाळेतील जेष्ठ शिक्षक रमेश पवार, यांनी केले. नंतर उपस्थितांनी भांगे सर यांच्या कार्य काळातील त्यांचे गुण गौरव सांगितले. यावेळी विद्यार्थीनी कु.गौरी इंगळे व कु.वैभवी कदम यांनी सरांबाबत आपले मत व्यक्त केले, शाळेतील शिक्षक शिवशंकर पंचपुत्रे, बालाजी देशमाने, बाबासाहेब आचार्य, सौ.राजे मँडम, प्रितमसर खंदारे अंगणवाडी सेविका कु.छाया उकंडे, कमलबाई कांबळे व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन शिवशंकर पंचपुत्रे यांनी तर आभार शलाका राजे मँडम यांनी मानले.

---

# भारतीय संविधान आपल्यासाठी प्रेरणादायी - सरसेनापती फुलचंद कराड

**परळी /प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील तमाम बहुजनांच्या उद्धारासाठी दिलेले भारतीय संविधान आपल्यासाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड यांनी केले. ते मौजे लिंबूटा येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

तालुक्यातील लिंबुटा येथे महामानव, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड हे होते. तर लिंबुटा गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ.दैवशाला बनसोडे, फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व पत्रकार भगवान साकसमुद्रे, माजी सभापती पंडित झिंजुर्डे, समता सैनिक दलाचे जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष डॉ. स्वप्निल महाळंगीकर, उपसरपंच प्रकाश राठोड , ग्रामपंचायत सदस्य रवी कराड, माजी उपसरपंच अरुण मुंडे, माजी सरपंच महादेव कराड युवा नेते मनोज मुंडे जयपाल पाचंगे, भीमराव मुजमुले, अभिमन्यू घोबळे, दादाराव जगताप व समता सैनिक दल महिला मंडळ पांगरी यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलताना सरसेनापती फुलचंद कराड म्हणाले की भारतीय संविधानाचे प्रत्येक नागरिकांनी वाचन केले पाहिजे जेव्हा आपण बाबासाहेबांनी दिलेले हे अनमोल संविधान वाचाल तेव्हा आपले हक्क आणि अधिकार कसे जतन केले पाहिजेत हे लक्षात येते या देशात ज्यांना कोणताच अधिकार नव्हता हजारो वर्ष जो समाज गुलामीत होता त्यांना बाबासाहेबांनी मानव मुक्तीचा लढा देऊन विकासाच्या प्रवाहात आणले. याप्रसंगी पत्रकार भगवान साकसमुद्रे आपल्या भाषणात म्हणाले की, जगात अधिकार नसलेल्या लोकांना गुलाम म्हटले जाते तर भारतात मात्र त्यांनाच शूद्र संबोधले जाते. याप्रसंगी डॉ स्वप्निल महाळंगीकर व पंडित झिंजुर्डे यांनीही आपले विचार मांडले. या कार्यक्रमाच सूत्रसंचालन दीपक बनसोडे यांनी तर जयंती उत्सव समितीने पाहुण्यांचे आभार व्यक्त केले . यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम तसेच लैझीम संघ,होतकरू मुलांना एक वही एक पेन वाटप केले.कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणाऱ्या शिक्षकांचे संस्कार, ज्ञान कायम जिवंत राहते - ऋषिकेश कराड

## श्रीराम विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा

**लातूर** | शिक्षक म्हणजे गुरु आणि गुरु म्हणजे विचार हा विचार कधीच सेवानिवृत्त होत नसतो तो विचार सातत्याने ज्वलंत राहणारा आहे. शिक्षक हे केवळ शिकवत नाही तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्याचे काम करतात त्यांचे संस्कार आणि ज्ञान कायम जिवंत राहतात खऱ्या अर्थाने शिक्षक हे कधीच निवृत्त होत नाहीत तर ते कायम मार्गदर्शकाच्या भूमिकेतून कार्यरत राहणारे व्यक्तिमत्व आहे असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर येथील रेणुका शिक्षण संस्थेच्या श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे यांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा शुक्रवार १ मे २०२६ रोजी मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार श्री विक्रम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला याप्रसंगी ऋषिकेशदादा कराड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी माजी आमदार बब्रुवान खंदाडे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, पसं उपसभापती शरद दरेकर, रेणापुरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, जेष्ठ मार्गदर्शक ओमप्रकाश गोडभरले, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदास कुटवाड, सचिव पंडितराव उगले, उपाध्यक्ष रविकांत आकनगिरे, नगरपंचायतीचे राजू आत्तार, दत्ता सरवदे, पदमसिंह पाटील, सचिन मोटेगावकर, चेअरमन देविदास कातळे, संस्थेचे विठ्ठल कटके, सुधीर बरुरे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

शाळेत जाईपर्यंत आई-वडिल घडवतात आणि आयुष्याला दिशा देण्याचे काम शिक्षक करीत असतात. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया असून शिक्षकांच्या गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच अनेकांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडले असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, सिद्धेश्वर मामडगे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या त्याचबरोबर संस्थेच्या प्रगतीत मोलाची कामगिरी केली असून आज जरी ते सेवानिवृत्त होत असले तरी उर्वरित आयुष्यातील वाटचालीचा समाजासाठी, कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी नवा अध्याय सुरू करत आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा प्रकाश सतत पसरत राहील त्यांच्या हातून या पुढील काळातही समाजाची सेवा घडो अशा सदिच्छा दिल्या.

गावचे सरपंच, चेअरमन, पतसंस्थेचे चेअरमन जिथे जाईल तिथे मिळालेल्या संधीच सोनं करण्याचा प्रयत्न विविध पुरस्कार प्राप्त सिद्धेश्वर मामडगे सरांनी केला असल्याचे उद्‌गार काढून आ. विक्रम काळे म्हणाले की, हजारो विद्यार्थी घडविण्याचे काम त्यांच्या हातून झाले असून शिकून किती गेले यापेक्षा शिकलेले काय करतात हे महत्त्वाचे आहे. मामडगे सरांनी अत्यंत निष्ठेने कर्तव्य निभावले आहे. प्रत्येक कामात स्वतःला झोकून देऊन




कार्य केले असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. प्रारंभी अनिल कुटवाड यांनी आपल्या प्रास्ताविकातून सिद्धेश्वर मामडगे यांच्या कार्याचा आढावा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्वर स्वामी आणि लोकां शेवाळे यांनी केले. या कार्यक्रमास शैक्षणिक सामाजिक व इतर विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

Last page

• बीड, रविवार, 3 मे 2026

# परळीतील व्यापाऱ्याची पोलीस अधीक्षकांकडे धाव

## जीवे मारण्याच्या धमकीसह खंडणीची मागणी - राजेश झंवर; प्रशासकीय कारवाईकडे लक्ष !

**परळी वैजनाथ | (प्रतिनिधी)**

परळी शहरातील व्यापारी राजेश रामप्रसाद झंवर यांनी पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून, जगदीश बियाणी ,जयप्रकाश बियाणी आणि अभिषेक बियाणी यांच्याकडून त्यांना मानसिक त्रास, खोटी बदनामी आणि जीवे मारण्याच्या धमक्या मिळत असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. या अर्जामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

तक्रारदार राजेश झंवर यांनी दिलेल्या अर्जानुसार, ते गेल्या २५ वर्षांपासून परळीत त्यांचा व्यवसाय आहे. झंवर यांनी अर्जात नमूद केले आहे की, जगदीश बियाणी ,जयप्रकाश बियाणी आणि अभिषेक बियाणी यांनी गेल्या काही काळापासून त्यांच्याकडे 50 लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली आहे. पैसे न दिल्यास खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची आणि समाजात बदनामी करण्याची धमकी सातत्याने दिली जात असल्याचे झंवर



यांनी म्हटले आहे.

जयप्रकाश बियाणी आणि अभिषेक बियाणी यांनी




वेळोवेळी व्हॉट्सअ‍ॅप आणि प्रत्यक्ष भेटीत पैशांची मागणी केल्याचा दावा झंवर यांनी केला आहे.राजेश झंवर यांच्या 'माहेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था' आणि इतर सामाजिक संस्थांबाबत चुकीची माहिती पसरवून लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न बियाणींकडून केला जात असल्याचा आरोपही अर्जात आहे.

तसेच सोशल मीडियाचा गैरवापर करून युट्यूब आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर झंवर यांच्याविरुद्ध चुकीच्या बातम्या प्रसारित करून त्यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

तसेच अर्जात राजेश झंवर यांनी आपल्या कुटुंबाच्या आणि स्वतःच्या जीविताला या व्यक्तींकडून धोका असल्याचे स्पष्टपणे म्हटले असून, प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन न्याय देण्याची मागणी केली आहे.

याबाबतची माहिती त्यांनी पत्रकार परिषद घेत सदरील सर्व बाबींचा खुलासा करून कशाप्रकारे आपली बदनामी होत आहे त्याचबरोबर आपल्या जीवितास कसा धोका आहे अशी ही माहिती दिली आहे.

तसेच माझ्या जीविताला या व्यक्तींपासून धोका निर्माण झाला असून, जर माझ्याबाबत काही अनुचित प्रकार घडल्यास त्याला जगदीश बियाणी ,जयप्रकाश बियाणी आणि अभिषेक बियाणी जबाबदार राहतील, असे झंवर यांनी आपल्या तक्रारीत स्पष्टपणे नमूद केले आहे.

या गंभीर आरोपानंतर आता पोलीस प्रशासन या प्रकरणाची कशा प्रकारे दखल घेते आणि काय कारवाई करते, याकडे परळीकरांचे लक्ष लागले आहे.

### प्रशासकीय कारवाईकडे लक्ष !

**राजेश झंवर यांनी या तक्रार अर्जाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पंकजाताई मुंडे, धनंजय मुंडे यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना पाठवल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी परळी शहरात घडलेल्या 'मल्टीस्टेट' घोटाळ्यातील आरोपींशी या व्यक्तींचे हितसंबंध असल्याचेही शक्यता झंवर यांनी व्यक्त केला असून, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची विनंती केली आहे.**

# मातोश्री विद्यालयाची एच.एस.सी. बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम










**महागाव | प्रतिनिधी**

महागांव येथील मातोश्री उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी / मार्च 2026 मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. उच्च माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल 100% लागला असून कला शाखेचा निकाल 98.14% आहे. तसेच इंग्लिश मिडीयम विज्ञान शाखेचा निकाल 99.16% लागला आहे. विद्यालयातून विज्ञान व कला शाखेतून एकूण 285 विद्यार्थी एच.एस.सी.बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले होते त्यापैकी 101 विद्यार्थी विशेष प्राविण्यासह तर 134 विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत.

उच्च माध्यमिक विज्ञान शाखेतून कु. सानिका अविनाश राऊत ही 92.67% घेवून प्रथम तर कु. समृध्दी किशोर ठाकरे 92.00% द्वितीय व कु. पल्लवी बालाजी केंद्रे ही 87.00% गुणासह तृतीय आली आहे. तसेच कला शाखेतून कु. संचिता गजानन बसवते हि 76.67% गुण प्राप्त करून प्रथम आली आहे. कु. श्रध्दा संजू अढागळे ही 75.67% गुणासह द्वितीय तर कु. किरण विनोद राठोड 74.33% गुणासह तृतीय आली आहे. इंग्लिश मिडियम विज्ञान शाखेतून शिवांग विकास मुलंगे हा 89.00% घेवून प्रथम आला आहे. तर कु. अदिती परमेश्वर बिरादार 88.83% गुणासह द्वितीय तर कु. वैदही सुधिर भांगे 88.33% गुणासह तृतीय आली आहे.

सर्व यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. संस्थापक डी. पी. जगताप यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय व इंदिरा बालसदन नाथरा येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

## महाराष्ट्र दिनी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा करण्यात आला गौरव !

**परळी (प्रतिनिधी)**

श्रीनाथ मानव सेवा मंडळ संचलित पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय आणि इंदिरा बालसदन नाथरा येथे ६७ वा महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या मंगल प्रसंगी शाळेच्या वार्षिक परीक्षेचे निकालही जाहीर करण्यात आल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालयाचे ध्वजारोहण मुख्याध्यापिका सुलेखा मुंडे मॅडम यांच्या हस्ते, तर इंदिरा बालसदनच्या तिरंग्याचे ध्वजारोहण अधीक्षक सुनील कराड सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित ग्रामस्थ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी



तिरंग्याला वंदन करून 'महाराष्ट्र दिन' आणि 'कामगार दिना'चा जयघोष केला.

ध्वजारोहण सोहळ्यानंतर सर्व वर्गांचे निकाल जाहीर करण्यात आले. प्रत्येक वर्गातून प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आपल्या पाल्याच्या यशाचे कौतुक पाहून पालकांनीही समाधान व्यक्त केले.

यांप्रसंगी बाळूभाऊ मुंडे, विकास मुंडे, गोविंद कराड, राजेभाऊ मुंडे, संदीपान मुंडे, विठ्ठल थोरवे, सुंदर चव्हाण, नारायण मुंडे, इरफान शेख, शिवाजी तिडके, शिवलाल कराड तसेच मिलन सिन्हा यांसह पालक वर्ग, गावातील युवक आणि शाळेचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सुनीता नरंगलकर यांचा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते गौरव

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

सामाजिक क्षेत्रात गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या श्रीमती सुनीता श्रीपतराव नरंगलकर यांना जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र व रुपये १०,००१ रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

श्रीमती नरंगलकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान तसेच कौटुंबिक समुपदेशन या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. कौटुंबिक सल्ला केंद्राच्या माध्यमातून



त्यांनी अनेक कुटुंबांतील तणाव कमी करून नातेसंबंध दृढ करण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत त्यांनी एकूण १७१ प्रकरणांवर समुपदेशन केले असून त्यापैकी १३४ प्रकरणे निकाली काढण्यात यश मिळवले आहे, तर ३१ प्रकरणे पोलिसांकडून संदर्भित करण्यात आली होती.तसेच कोविड काळात जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने जनजागृती, स्वच्छता व आरोग्य मार्गदर्शन केले. बालविवाह प्रतिबंध, बालमजुरी निर्मूलन आणि गरजू महिला व मुलांच्या पुनर्वसनासाठीही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार त्यांच्या कार्याची पावती ठरत असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## हॉटेल सपना फॅमिली गार्डन अँड रेस्टॉरंटचा भव्य शुभारंभ दिनांक 1 मे 2026 रोजी संपन्न झाला




**परळी अंबाजोगाई रोडवरील हॉटेल सपना या हॉटेलचा उद्घाटन समारंभ 1 मे रोजी महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन या दिनाचे औचित्य साधून हॉटेलचे चालक-मालक प्रो.प्रा.आकाश ज्ञानोबा फड व अक्षय ज्ञानोबा फड यांनी श्रीगणेश मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन या उद्घाटन प्रसंगी शुभेच्छा देताना वैजनाथ (आबा) कराड, आकाश फड, अक्षय फड, श्रीगणेश मुंडे, सम्राट गित्ते, श्रीनिवास गित्ते, संपादक नितीन ढाकणे, पत्रकार भगवान साकसमुद्रे, ऋषिकेश फड, बालाजी फड आदी छायाचित्र दिसत आहेत.**

# संस्कार शिबिरांमुळे मूल्याधिष्ठित समाजाची निर्मिती शक्य

## – उपविभागीय अधिकारी श्री अरविंद लाटकर

**परळी वैजनाथ |** आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धामुळे सर्वत्र चिंतेचे व अशांततेचे साम्राज्य पसरले असतानाच संस्कार शिबिरासारख्या प्रेरक उपक्रमांमुळे जगात प्रेम, सदाचार, दया, करुणा, सच्चारित्र्य, माणुसकी, सहिष्णुता आदी मानवी मूल्यांची जोपासना होऊन शांतता व सुख समृद्धी नांदू शकते, असे प्रतिपादन उपविभागीय अधिकारी श्री अरविंद लाटकर यांनी केले.

परळी येथून जवळच असलेल्या नंदागौळ मार्गावरील श्रद्धानंद गुरुकुल आश्रमात गेल्या आठ दिवसापासून सुरू असलेल्या "मानवता संस्कार व आर्य वीर दल प्रशिक्षण" शिबिराचा काल विविध कार्यक्रमांनी समारोप झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्री लाटकर बोलत होते. अध्यक्षस्थानी आर्य समाज परळीचे प्रधान श्री जुगल किशोर लोहिया हे होते. यावेळी श्री हरिसिंह आर्य (दिल्ली), निवृत्त नायब तहसीलदार श्री बाबुराव रुपनर, उग्रसेन राठौर, रंगनाथ तिवार , प्रशांतकुमार शास्त्री, डॉ. मधुसूदन काळे, आचार्य सत्येंद्रजी, श्री व्यंकटेश हालिंगे, स्वामी सोमानंद आदींची उपस्थिती होती.




श्री लाटकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संस्कार शिबिराच्या माध्यमातून आदर्श मानवाची निर्मिती होते, हे सांगून सध्या मोबाईल, व्यसनाधीनता व वाढत्या दुर्गुणामुळे विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. आर्य समाजाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या निसर्गोपचार चिकित्सा, वेदप्रसार, ध्यान योग, संस्कार शिबिरे इत्यादी उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. शरीर, मन व बुद्धीच्या विकासासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम राबविणे म्हणजे एक प्रकारे आदर्श समाजाच्या नवनिर्मितीकरिता उचलले गेलेले प्रेरक पाऊलच आहे, असे ते म्हणाले. अध्यक्ष समारंभात श्री लोहिया यांनी संस्कार शिबिरामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो असे उद्गार काढले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचा व दानदात्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांचे मनोगत झाल्यानंतर त्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमानंतर शिबिरार्थ्यांनी व्यायाम, योगासने, लेझीम, काठी प्रदर्शन, विविध मनोरे यांचे उत्कृष्ट देखावे सादर केले. कार्यक्रमास पालक व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. व्यायाम प्रशिक्षक सर्वश्री काशिनाथ आर्य, ओमकार मोहनाळे, कृष्णा आर्य यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मणराव आर्य गुरुजी यांनी तर सूत्रसंचालन प्रा. डॉ .अरुण चव्हाण यांनी केले . शेवटी डॉ.नयनकुमार आचार्य यांनी आभार मानले.